GR-200407191213060001-2500

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत पर्यवेक्षिका पदाच्या एकूण मंजूर पदांपैकी २५% पदे भरण्याकरिता निवड समित्यांची स्थापना करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक एबावि २००१/ प्र १४६/ का ६

नवीन प्रशासन भवन, मंत्रालय,

मुंबई -४०० ०३२.

दिनांक : - १७ नोव्हेंबर, २००१.

वाचा - १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रानिमं २७९७/८८८/१३ अ, दिनांक ३.१२.१९९७.
२. शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक एबावि-१०९६/प्र क्र ५०८/का-६, दिनांक ५ जानेवारी, १९९८.

निर्णय- एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या पर्यवेक्षिकांच्या (मुख्यसेविका) एकूण पदांपैकी २५% पदे अर्हताप्राप्त (मॅट्रीक्युलेट) व १० वर्षे मानधनी सेवा झालेल्या अंगणवाडी सेविकांमधून भरण्यास शासन निर्णय, महिला व बाल कल्याण विभाग, क्रमांक एबावि-१०९६/प्र क्र ५०८/का-६, दिनांक ५ जानेवारी, १९९८ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये २५ % पदे भरण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सदर दिनांक ५ जानेवारी १९९८ च्या शासन निर्णयातील आदेश अधिक्रमीत करुन खालील प्रमाणे सुधारित आदेश देण्यात येत आहेत :-

(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या सर्व प्रकल्पांमधील पर्यवेक्षिकांच्या मंजूर पदांपैकी २५ % पदे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा [यामध्ये शासनाने या परीक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत आहेत.] उत्तीर्ण व १० वर्षे मानधनी सेवा झालेल्या अंगणवाडी सेविकांमधून भरण्यास शासन मान्यता देत आहे.

(२) सदर २५ % पदे प्रादेशिक दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतून सामान्य प्रशासन विभागाच्या वर नमूद केलेल्या दिनांक ३.१२.९७ च्या शासन निर्णयान्वये वगळण्यात आली आहेत. त्यामुळे सदर पदे भरण्याकरिता खालीलप्रमाणे निवड समित्यांची स्थापना करण्यात येत आहे.

अ)ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांकरिता प्रत्येक जिल्हयात स्थापन करावयाची जिल्हा स्तरीय निवड समिती

१.जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२.मुख्य कार्यकारी अधिकारी	सदस्य
३.विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी	सदस्य
४.प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (जेथे २ वा त्यापेक्षा जास्त प्रकल्प अधिकारी असल्यास ज्येष्ठतम अधिकारी)	सदस्य
५.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण / ग्राम पंचायत)	सदस्य सचिव

३) नागरी प्रकल्पांकरिता समिती

१.आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे	अध्यक्ष
२.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई किंवा त्यांचा प्रतिनिधी	सदस्य
३.विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे	सदस्य
४.उप आयुक्त (प्रशासन), महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे	सदस्य सचिव

२. वरील समित्यांमार्फत २५ % पदे भरतीसाठी उमेदवारांची निवड करतांना खालीलप्रमाणे कार्यपध्दती

अवलंबिण्यात यावी -

१) ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांबाबत प्रत्येक जिल्ह्यातील पर्यवेक्षिकांची मंजूर पदे, रिक्त पदे व अंगणवाडी सेविकांमधून भरावयाची २५ % पदे याबाबतचा तपशील संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तयार करावा व त्यानुसार अंगणवाडी सेविकांमधून भरावयाची २५ % पदांची संख्या निश्चित करुन भरती प्रक्रिया सुरु करावी.

२) [illegible]

४] पर्यवेक्षिकांची पदे भरण्यासाठी ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांच्या बाबतीत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आणि नागरी प्रकल्पांच्या बाबतीत आयुक्त,महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वर नमूद केलेल्या परिच्छेद क्रमांक २ [३] [अ] [ब] मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक पात्रता धारण करणा-या अंगणवाडी सेविकांचे अर्ज मागवावेत. ज्या उमेदवारांचे अर्ज प्राप्त होतील त्या उमेदवारांची एकात्मिक बाल विकास सेवा योजनेशी संबंधित विषयाची १०० गुणांची, फक्त एकच प्रश्न पत्रिका असलेली लेखी परीक्षा घेण्यात यावी. प्रश्नपत्रिकेचे स्वरुप वस्तुनिष्ठ स्वरुपाचे असावे.

५] प्रत्येक जिल्ह्यातील सर्व ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हानिहाय परीक्षा आयोजित करावी आणि नागरी प्रकल्पासाठी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी सर्व नागरी प्रकल्पांतील उमेदवारांसाठी एकत्रित परीक्षा आयोजित करावी.

६] ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांकरिता संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी परीक्षा केंद्रे निश्चित करावीत. ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांकरिता परिक्षेचे केंद्र शक्यतो जिल्ह्याच्या ठिकाणी ठेवण्यात यावीत. तथापि उमेदवारांची संख्या विचारात घेऊन आवश्यक तेवढी परीक्षा केंद्रे व त्यांची ठिकाणे निश्चित करावीत. नागरी प्रकल्पांकरिता घ्यावयाच्या परीक्षेची परीक्षा केंद्र आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निश्चित करावीत.

७] ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांतील [illegible]

१०] लेखी परीक्षेतील गुणानुक्रमे (प्रथम क्रमांकापासून) तयार केलेल्या यादीतील उमेदवारांपैकी, भरती करावयाच्या जागेच्या ३ पट संख्येइतक्या उमेदवारांना तोंडी मुलाखतीसाठी बोलाविण्यात यावे.

११] तोंडी मुलाखतीसाठी २० गुण राहतील.

१२] तोंडी मुलाखतीमधील २० गुणांपैकी उमेदवाराला मिळालेले गुण, उमेदवाराच्या लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणामध्ये समाविष्ठ करुन भरावयाच्या पदांइतकी अंतिम निवड यादी शासनाच्या सेवाभरती व आरक्षण विषयक नियमानुसार तयार करण्यात यावी.

१३] भरावयाच्या पदांइतकी अंतिम निवड यादी तयार झाल्यानंतर अंतिम निवडयादीच्या १५ % इतक्या उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी.

१४] ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांकरिता जिल्हा निहाय निवड यादी तयार करण्यात यावी. नागरी प्रकल्पांकरिता संपूर्ण राज्याकरिता एकत्रित निवड यादी तयार करावी.

१५] सदर अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी फक्त एक वर्षाच्या कालावधीसाठी वैध राहील व नंतर ती आपोआप रद्द समजण्यात येईल.

[illegible] प्रमाणे नेमणुका देण्यात याव्यात.

ग्रामीण व आदिवासी प्रकल्पांसंदर्भात ग्राम विकास व जलसंधारण विभागाने जिल्हा परिषद कर्मचारी सेवा भरती नियमांमध्ये वरील निर्णयानुसार योग्य त्या सुधारणा कराव्यात. तसेच नागरी प्रकल्पांच्या संदर्भात सेवा भरती नियमात सुधारणा करण्याची कार्यवाही आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

४. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, कोकण भवन, नवी मुंबई यांनी सदर शासन निर्णयाप्रमाणे पर्यवेक्षिकांच्या मंजूर पदांपैकी २५ % पदे अंगणवाडी सेविकांमधून भरली जातील याबाबत संनियंत्रण करावे.

५. या शासन निर्णयापूर्वी दिनांक ५.२.१९९८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निवडीसाठी अंगणवाडी सेविकांचे अर्ज मागविण्यात आले असतील व ज्यांचे अर्ज प्राप्त झाले असतील, मात्र परीक्षा होऊन निवड प्रक्रीया झाली नसेल तर अशा उमेदवारांना परीक्षेला बसण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच यापूर्वी ज्यांची सर्व निवड प्रक्रिया पूर्ण झाली आहे व त्यानुसार ज्यांची नियुक्ती झाली आहे, त्यांना या शासन निर्णयातील तरतुदीनुसार बाधा येणार नाही.

६. सदर २५% पदे भरतीकरिता मागासवर्गीयांचे आरक्षण प्रचलित नियमानुसार लागू राहील. तसेच नागरी प्रकल्पातील पर्यवेक्षिकांच्या एकूण मंजूर पदाच्या २५% पदे नियमानुसार भरण्याची व याबाबतच्या संपूर्ण कार्यवाहीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेवर सोपविण्यात येत आहे.

[illegible] पर्यवेक्षिकांची पदे भरण्याची [illegible]

मुख्य अधिकारी, नगरपालिका (सर्व)
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र-1/2 (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
उप संचालक, स आ यो, महिला व बाल कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सहसंचालक, स आ यो, तथा विभागीय अधिकारी, महिला व बाल कल्याण, मुंबई
बाल विकास प्रकल्प अधिकारी (ज्ये) तथा विभागीय अधिकारी, महिला व बाल कल्याण, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती विभाग
विभागीय आयुक्त, कोकण पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण/ग्राम पंचायत), जिल्हा परिषद
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
सर्व समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी
सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
उप सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
कक्ष अधिकारी, का-१ व ५ महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, कार्यासन- ६